म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा.
दा. क्र. ४५९८

# नरसी भगत

BVBK-0404597

भारती



म. ग्रं. सं. ठाणें
विषय
वा. नं.

# नरसी भगत

भारती

# नरसी भगत

नों. दि.

ले.

**भारती**

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क. .................. नों. दि ..............
वि: .................. क. ..................

★ ★ ★

BVBK-0404597

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर.
१९५४.

: प्रकाशक :
गोविंद वामन कुलकर्णी
महाराष्ट्र ग्रंथ भांडार,
कोल्हापूर.

किंमत ६ आणे

: मुद्रक :
गो. वा. कुलकर्णी
सेवा मुद्रणालय, कोल्हापूर.

साहित्य हें समाजविकासाचें एक प्रमुख साधन आहे. समाजाची सर्वांगीण उन्नति त्याच्या शारिरीक, बौद्धिक आणि मानसिक विकासावर अवलंबून असते. शरीरवर्धनाला सात्त्विक आहाराची जितकी जरूरी असते तितकीच गरज सात्त्विक साहित्याची मनसंवर्धनासाठीं असते. शुद्ध निर्मल जलप्रवाहाप्रमाणें साहित्य प्रवाहहि शुद्ध, निर्मल आणि आशा, उत्साह, भूतदया, समता या जलधारांनीं समृद्ध असायला हवा.

सध्यां बहुजनसमाजांत साक्षरतेचें प्रमाण वाढत आहे. देशाच्या भावी उत्कर्षांच्या दृष्टीनें या समाजमनाचा योग्य तऱ्हेनें विकास होण्यासाठीं अशा सात्त्विक वाङ्मयाची आज विशेष गरज आहे. त्या दृष्टीनें हें पुस्तक लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

२६।४।५४

—भारती

अनुक्रम १५३५५
विभाग ब-८-८४१.१५.२.५
क्रमांक ८३८
नों. दि. २१।१२।५७

# नरसी भगत

डॉ. दीनानाथ यांनीं हिंवतापावर [ मलेरिआवर ] निघालेल्या नवीन औषधोपचाराचें पुस्तक वाचून संपवलें. तेव्हां बाहेर नुकतेच कुठें उजाडत होतें. पुस्तक टेबलावर ठेवून तें बाहेर व्हरांड्यांत आले. समोर पूर्वदिशेला क्षितिजालगत दिसणाऱ्या डोंगरांच्या मागून सूर्याचा लालबुंद गोळा हळू हळू वर सरकत होता. आकाशांतून बगळ्यांची पांढरी रांग त्याच दिशेनें चालली होती. समोर तलावाच्या पलीकडे जें अफाट मैदान पसरलें होतें तिकडे त्यांचें लक्ष गेलें आणि ते आश्चर्यचकित झाले. ते भलं मोठं मैदान कसल्याशा चित्रविचित्र प्राण्यांनीं भरून गेलें होतें. काळसर, तांबूस, तपकिरी, तांबडे अशा विविध रंगांचे ठिपके मैदानभर हालत होते. वाऱ्याच्या झुळूकीनें गवताचीं पातीं हलावीं ना? अगदीं तस्सेच! डॉ. दीनानाथ आश्चर्यचकित होऊन मनाशीं विचार करूं लागले. 'अं! हें आहे तरी काय? मघांशीं पुस्तकांत वाचलेले ते हिंवतापाच्या डासांचे थवे तर नव्हेत हे! कीं राजस्थानांत टोळधाड पडली असं वर्तमानपत्रांत काल वाचलें होतें, ती टोळधाड या मैदानांत उतरलेय? हा आहे तरी काय प्रकार.'

आपल्या उजव्या हाताची त्यांनीं पोकळ मूठ बनविली आणि ती दुर्बिणीसारखी आपल्या उजव्या डोळ्यासमोर धरून बारिक नजरेनें त्यांनीं मैदान न्याहाळलें. तेवढ्यांत सूर्याचें लाल भडक बिंब सोनेरी झालें आणि त्याच्या कोवळ्या पिवळसर प्रकाशांत समोरचें तें मैदान स्पष्ट दिसूं लागलें. ते हालणारे ठिपके म्हणजे डांस किंवा टोळ

नसून गाईंचीं खिल्लारें होतीं तीं ! वीस-तीस-पन्नास-शंभर--दोनशें-पांचशें-हजार-छे ! छे ! मोजतांच येत नव्हतीं. असंख्य गाई ! त्या अफाट मैदानाच्या चारी बाजूला कुठेंहि नजर ठरत नव्हती. या टोंकापासून त्या टोंकापर्यंत गाईच गाई ! या एवढ्या अगणित गाई एकदम एका रात्रींत इथें आल्या तरी कुठून आणि कशा आल्या ? काल संध्याकाळीं अगदीं अंधार पडेपर्यंत गांवांतल्या हायस्कूलमधलीं मुलें इथें क्रिकेट, फूटबॉल खेळत होतीं. प्राथमिक शाळेंतलीं पोरें पतंग उडवीत होतीं. गांवांतली फिरायला आलेली मंडळी या तलावाच्या कांठी हवा खायला बसली होती. पण अंधार पडतांच रोजच्याप्रमाणें हें सर्व मैदान अगदीं मोकळें झालें होतें. त्यावेळीं इथें एकहि गाय, गायच काय पण एकादें छोटेंसं वासरूंहि कुठें दिसत नव्हतें. असें असतांना मग एका रात्रींत हें मैदान या असंख्य गाईवासरांनीं फुलून गेलें कसें ? मोठाच चमत्कार म्हटला पाहिजे !

लहानपणीं कृष्ण चरित्र वाचतांना, भगवान् श्रीकृष्णानें गोवर्धन पर्वत आपल्या करांगुलीवर उचलून धरून त्याखालीं गोकुळांतलीं सर्व गुरें गोळा केलीं होतीं हें वर्णन डॉ. दीनानाथनीं वाचलेलें होतें, त्याची त्यांना आतां आठवण झाली. सकाळच्या शुभसमयीं समोर नजरेस पडलेलें हें गोधनाचें दृश्य सध्यांच्या युगांत तरी दुर्मिळ होतें, आणि म्हणूनच त्यांना तें दृश्य मोठं अलौकिक आणि मोठं भक्तिप्रद वाटलें. त्या मैदानांत मधून मधून जे तांबडे हालते ठिपके दिसत होते तीं गवळी लोकांचीं डोक्याला बांधलेलीं तांबडीं मुंडाशीं आहेत हें आतां वाढत्या सूर्यप्रकाशांत त्यांना स्पष्ट दिसत होतें. एवढ्या या असंख्य गाई घेऊन हे लोक निघाले आहेत तरी कुठें ? हा सारा प्रकार आहे तरी काय याची चौकशी करावी अशा

विचारानें ते खालीं उतरणार तेवढ्यांत समोरून तळ्याच्या बाजूनें डोक्याला लाल मुंडासें बांधलेला, अंगांत जाड्याभरड्या खादीचें मळकट कुडतें घातलेला, खांद्यावर काळी घोंगडी टाकलेला एक गुराखी आणि त्याच्या सारखाच पोशाख केलेला आठ नऊ वर्षांचा छोटा पोरगा आपल्या बंगल्याकडे येत असल्याचें त्यांना दिसलें.

रस्ता ओलांडून फाटकाशीं येतांच तिथें अशोकाच्या झाडाखालीं सकाळच्या रामप्रहरीं गुडगुडी ओढीत बसलेल्या म्हाताऱ्या माळ्यानें त्यांना अडवलें नि हटकलें. हातांतली गुडगुडी काठीसारखी उगारीत तो त्यांच्या अंगावर गुरगुरला आणि शेलक्या शिव्या हांसडीत त्यानें फाटक बंद करून घेतलें.

डॉ. दीनानाथ वरून व्हरांड्यांतून हें सर्व पाहात होते. ते एकदम मोठ्यानें करड्या आवाजांत म्हणाले,

' माळी, त्या माणसाला वर पाठव. '

विंचवाची उगारलेली नांगी एकदम खालीं पडावी तशी माळ्याच्या उगारलेल्या हातांतली गुडगुडी फटदिशीं खालीं पडली. खालच्या मानेनें त्यानें फाटक सताड उघडून टाकलें.

मुलाला हाताशीं धरून तो गवळी हळू हळू भीत भीत जिना चढून वर गेला. त्याच्या झुबकेदार मिशांचे केस मधून मधून पांढरे दिसत होते. तरी पण एकंदरींत प्रकृतीनें तो मोठा धिप्पाड नि दणकट दिसत होता. आंत येतांच डोकें जमिनीपर्यंत वांकवून त्यानें डॉक्टरांना ' राम राम ' केला.

डॉक्टरनीं म्हटलें, ' तुम्ही लोक एवढ्या गाई घेऊन निघाला आहांत तरी कुठें ? '

आकाशाकडे पाहात त्या गवळ्यानें हात जोडले आणि म्हटलें, ' भगवान् वाट दाविल तिकडं. काय सांगूं साहेब ? वरल्या अंगाला

(उत्तरेकडे) आमच्याकडं कोरडा दुष्काळ पडलाय, गेलीं दोन साल पाऊसपानी नाई, खायला धान नाई, गुराम्नी वैरान नाई, पानी बी नाई.'

'अरे रे !

'साहेब, मानसं, गुरंढोरं भुकेतानेनें तडफडून पटापट मराया लागलीं. तवां उरलेलीं गुरं घेऊन, घरदार सोडून खालच्या अंगाला (दक्षिणेकडे) चाललोंय.'

डॉक्टर दिनानाथ अस्वस्थ चित्तानें दुष्काळाची करुण कहाणी ऐकत होते. त्यांनीं विचारलें, 'नांव काय तुमचें ?'

'मला गरिबाला भगत गवळी म्हणतात. गवळी लोक आम्ही. माज्या गरिबावर एक दया करा साहेब.'

'काय करूं ?'

'हा माझा धाकला पोरगा. गेले चार दिवस चालून चालून दमून गेलेय पोर. याला तुमच्या पदरीं ठिवून घ्या. कांहींबी काम सांगा. लहान हाये पन पोरगं तसं लई हुशार हाये. पोटाला शिलं-पाकं घाला. जुने फाटके कपडे घालाया द्या. एवढी दया करा. आपलें रीण इसरणार नाहीं. नरसी, पोरा, पुढं हो नि साहेबांच्या पायां पड.'

नरसी चटकन् उठला आणि त्यांच्या पायां पडला. डॉक्टरनीं त्या नऊ वर्षांच्या मुलाकडे पाहिलें. त्या पोराचा कोवळा चेहरा सुकलेल्या फुलासारखा मलूल झाला होता. त्यांना त्याची दया आली आणि त्याला आपल्याकडे ठेवून घ्यायचें त्यांनीं मान्य केलें.

× × × ×

**डॉक्टर दीनानाथ यांचा आसरा**

दुसरे दिवशीं गुरांचा आणि गवळ्यांचा तळ हालला आणि

नरसी डॉ. दीनानाथ यांच्या घरीं राहिला. त्याचा बापुडवाणा, भांबावलेला, घाबरलेला चेहरा पाहून कुणालाहि त्याची दया वाटावी. एवढ्याशा छोट्या आणि त्यांत अडाणी खेडवळ पोराला काम तरी कसलें सांगणार? शिवाय त्याला सांगण्यासारखें काम तरी घरांत होतें कुठें? सहा खोल्यांच्या दुमजली बंगल्यांत डॉ. दीनानाथ एकटेच राहात होते. त्यांचें अद्याप लग्न झालेलें नव्हतें. त्यांना जेवण करून वाढायला हरिभटजी नांवाचा एक ढेरपोट्या बुटका सैंपाकी होता. इतर कामाला किसन नांवाचा एक नोकर होता. कांहींतरी काम सांगायचें म्हणून मग त्याला माळ्याच्या हाताखालीं सकाळ संध्याकाळ बागेंतल्या फुलझाडांना पाणी घालण्याचें काम दिलें. हें काम आटोपलें कीं नरसी बंगल्याच्या मागच्या बाजूला नोकरांची जी खोली होती तिथें बाहेर दाराशीं बसे, आजूबाजूला टकमक पाहात राही.

खेड्यांतला मुलगा तो. डॉक्टरांच्या शहरी बंगल्यांतल्या वस्तू आणि तिथलें वातावरण त्याला अगदीं नवीन होतें. तिथल्या कित्येक वस्तू त्यानें जन्मांत कधीं बघितल्या नव्हत्या. दारामागें भिंतीवर असलेल्या काळ्या चकतीवरचें बटन खालीं ओढलें कीं छताला टांगलेल्या कांचेच्या गोळ्यांत डोळे दिपवणारा प्रकाश भरतो कसा याचें त्याला आश्चर्य वाटे. संध्याकाळीं दिवे लागले कीं तिकडे तो तासन्तास बघत बसे. आणि मग रात्रीं खोलीच्या कोपऱ्यांत फाटक्या सतरंजीवर जुन्या चादरींनं गुरफटून पोटाशीं पाय घेऊन तो झोंपे तेव्हां त्याच्या अडाणी, चिमुकल्या डोक्यांत त्या दिव्यांचाच विचार चालू असे.

एक दिवस असाच तो दिव्याकडे टक लावून बघत बसला असतां किसननें त्याच्या डोक्यावर टप्पल मारून म्हटलें—

'काय नरश्या ! अरे, असा जबडा वासून त्या लाइटाकडे काय बघतोयस इतका ?'

नरसी एकदम लाजला. 'नाय बा ! कांई नाई...पन काय व्हो, तेल वात विगर हे दिवे पेटतात कसे ?'

किसननें पुन्हां त्याच्या डोक्यांवर एवढ्या जोरांत टप्पल मारली कीं त्या बिचाऱ्याचें फाटकें मुंडासें उडून खालीं पडलें. त्यानें म्हटलें,

'हट्, वेंधळ्या ! निसता धनगर आहेस धनगर ! तेलवात करायला ही काय तुझ्या गवळीवाड्यांतली डबडीं आहेत, होय रे ? गांवढळा, अरे या लाइटांत वीज भरलेली असते वीज.'

खालीं पडलेलें मुंडासें आपल्या डोक्याला नीट गुंडाळीत नरसीनें विचारलें, 'आँ ! ईज ? म्हंजे, आभाळांत लकलकते ती ईज या काचेच्या गोळ्यांत धरलेली हाये म्हणतां ?'

'व्हय रे माझ्या शहाण्या ! आभाळांतली ईज आहे. आतां मुकाट्यानें काम कर. चल, तें कोळशाचं पीप बाहेर नेऊन साफ कर.'

चाकराला पडचाकर म्हणतात ना ? तशी गत झाली होती नरसीची. नोकरांनीं त्याला आपला हरकाम्या बनवला होता. आणि तो पोरगाहि न कंटाळता पडेल तें काम मोठ्या हौशीनें चटपट करून टाकीत असे.

मधून मधून डॉ. दीनानाथ सकाळीं उठल्याबरोबर फेरफटका मारण्यासाठीं आणि पहाणी करण्यासाठीं बागेंत येत. त्यावेळीं माळ्याच्या हाताखालीं फुलझाडांना पाणी घालण्याच्या कामांत नरसी गुंतलेला असे. डॉक्टर विचारीत, 'काय नरसी, कसं काय वाटतं तुला इथें ? बरं वाटतंय ना ?'

भांबावलेल्या नरसीची जीभ टाळ्याला चिकटे. हात लावतांच

लाजाळूच्या झाडाचीं पानें मिटावींत तसा तो संकोचून, आंग चोरून फुलझाडांत तोंड लपवी. डॉक्टर हंसत पुढें निघून गेले कीं माळी त्याच्या आंगावर खेंकसे--

'रामापारची दांतखिळी बसली कीं काय तुजी ?'

कांहीं दिवसांनीं त्याचा हा बुजरेपणा कमी झाला. आतां डॉक्टरनीं प्रश्न केला कीं खालीं मान घालुन तो चांचरत म्हणे--

'जी. आपल्या कृपेनं बरं हाये.'

महिन्या दोन महिन्यांतच हरेक कामांत नरसी हुशार बनला. जात्याच तो कष्टाळू होता हें खरें. पण त्यापेक्षांहि प्रत्येक नवीन गोष्टीबद्दल त्याला जें कुतूहल वाटे तें कुतूहल पूर्ण करण्यासाठीं नवीन नवीन कामें तो मोठ्या उत्साहानें करी.

× × × ×

**नरसीचा पराक्रम**

त्या दिवशीं असें झालें, बंगला झाडण्याचें स्वतःचें काम नरसीवर सोंपवून किसन भाजी, आणण्याच्या निमित्तानें गांवांत भटकायला निघून गेला होता. मागील दारीं सैंपाकी माळ्याला गरमागरम स्पेशल चहाचा कप देऊन आपणहि घेत त्याच्याबरोबर गप्पा मारण्यांत गुंतला होता. नरसीनें कोंपऱ्यातली केरसुणी आणि हातभर काठीला गुंडाळलेलें फडक्याचें झटकणें घेतलें नि तो वर दिवाणखान्यांत आला. अगदीं एकट्यानें स्वतंत्रपणें असा तो आजच इथें पाऊल टाकीत होता. किसननें आज आपल्यावर टाकलेल्या जबाबदारीचा त्याला अभिमान वाटला. जणूं सगळा बंगला आज आपल्याच ताब्यांत आहे अशा ऐटींत त्यानें चौफेर नजर टाकली. डॉक्टर घरीं आले कीं दुपारीं आणि रात्रीं गाणारा नि बोलणारा रेडिओ पाय पोटाशीं घेऊन, निळी पिशवी पांघरून, डोळे झांकून

पडलेल्या वासरासारखा समोरच्या टेबलावर शांत बसला होता. उगीचच भिंगरीसारखा फिरणारा विजेचा पंखा, पंख पसरलेल्या पाकोळी सारखा छताला चिकटला होता. आणि दिव्याचे ते काचेचे गोळे ! त्यांचे लक्ष एकदम समोर पुस्तकाच्या टेबलाकडे गेलें. तिथें वाकलेल्या देठावरच्या कमळाच्या कळींत विजेचा दिवा बसवलेला होता. त्या काचेच्या गोळ्याकडे त्यानें टक लावली. त्या नादांत त्याच्या हातातली केरसुणी नि झटकणें केव्हां गळून पडलीं हें पण त्याला समजलं नाहीं. मंत्रानें भारल्यागत तो हलके हलके टेबलाजवळ गेला. देठाखालच्या पानावरचं हिरवं बटन दाबलें कीं गोळ्यांत प्रकाश भरतो हें त्यानें पाहिलेलें होतें. किसननेंच त्याला तें दाखवलेलें होतें. त्यानें मोठ्या कुतूहलानें पटकन् बटन दाबलें. वा ! झगझगीत प्रकाश ! त्या प्रकाशानें त्याचे डोळे दिपले. त्यानें पुन्हां बटन दाबलें. ' आँ ! हें काय ? प्रकाश बंद ! एकदां बटन दाबलं कीं प्रकाश, पुन्हां दाबलें कीं अंधार. वा ! मोठी गंमतच आहे. पुन्हां पुन्हां बटन दावून प्रकाश आणि अंधाराच्या या गंमतीचा खेळ त्यानें एक दोन मिनीटें चालविला. मग प्रकाश बंद करून काचेच्या गोळ्याचें डोकें दाबून फिरवलें, काय जादू ! गोळा चट्कन् त्याच्या हातांत आला. त्यानें तो उलटसुलट निरखून पाहिला. गोळा बसवलेला होता त्या खोबणींत आपली बोटें दाबून धरलीं हो. या निर्जीव काचेच्या गोळ्यात जर वीज भरते तर आपल्या बोटात का भरूं नये ! आतां मजा होणार. त्यानें बटन दाबले.

कसला तरी धाडकन झालेला आवाज आणि नरसीचें किंचाळणें थेट खालीं सैंपाकघराच्या मागीलदारीं गप्पांत रंगलेल्या हरिभटजीच्या कानीं गेलें. तो नि माळी वर धावले. येऊन पाहतात तों दिवाणखान्याच्या दारांत नरसी बेशुद्ध पडला आहे. डोक्याला खोक

पडून त्यांतून भळाभळा रक्त वाहात आहे. आजूबाजूला दुसरें कुणी दिसेना. या पोराच्या डोक्यांत मारलें कुणी आणि एवढ्या जोरांत ढकलून दिलें कुणी ? आँ ! हा काय भुताटकीचा प्रकार घडला कीं काय तरी ? हरिभटजी आ वासून बघत राहिला. माळी डॉक्टरांना बोलावण्यासाठीं दवाखान्याकडे धूम पळत सुटला.

डॉ. दीनानाथ यांनीं आल्याबरोबर नरसीची नाडी बघितली. दिवाणखान्याचें सूक्ष्म निरीक्षण केलें. दिवसा बंगल्यांत चोर येण्याची कांहीं शक्यता नव्हती. दिवाणखान्यांतल्या सगळ्या वस्तू जिथल्या तिथें जाग्यावर होत्या. बघतां बघतां सहज त्यांचें समोरच्या पुस्तकाच्या टेबलाकडे लक्ष गेलें. 'टेबल लॅम्प' वाकडा तिकडा पडला होता. आंतला बल्ब फुटून जमिनीवर जिकडे तिकडे कांचा पसरल्या होत्या. दिव्याचं बटन उघडें होतें. काय घडलें असावें हें चटकन् त्यांच्या लक्षांत आलें, आणि मग ताबडतोब त्यांनीं उपचार सुरू केले. नरसी शुद्धीवर आल्यावर त्याच्याजवळ नर्सला ठेवून ते दवाखान्यांत निघून गेले.

+ + +

**परिचारिकेचा कोप**

नरसी पूर्ण शुद्धीवर आल्यावर तासाभरानें परिचारिकेनें ( नर्स ) त्याच्या घशांत औषधाचा भाग ओतून म्हटलें—

'काय रे नरसी, तुला हा शॉक् (धक्का) कसा बसला रे ? काय करीत होतास त्या दिव्याशीं ?'

भेदरलेल्या नजरेनें नरसीनें आजूबाजूला पाहिलें. झालेला प्रकार त्याला हळू हळू आठवला. आणि जें आठवलें तें त्यानें सगळें खरें खरें सांगून टाकलें. तें ऐकून परिचारिकेनें संतापानें म्हटलें,

'गांवढळ मेला, डॉक्टरसाहेबांनीं तुझ्या बापावर दया करून

तुला ठेवून घेतला ते काय हे असले नसते उपद्व्याप करण्यासाठीं? आयतं खायला मिळत होतं तें खाऊन स्वस्थ बसायचं, तें सोडून हे नसते धंदे करतोस? थांब, तुला हांकूनच लावला पाहिजे.'

झालेल्या प्रकारानें, विजेच्या धक्क्यानें आधींच घाबरलेल्या भेदरलेल्या नरसीनें दीन मुद्रेनें तिच्याकडे पाहिलें. पण ती कशाला त्याच्याकडे पाहातेय! काळ्या-पांढऱ्या केसांची, उग्र चेहऱ्याची ती बुटकी परिचारिका तरातरा दवाखान्यांत निघून गेली.

दुपारीं रोग्यांची गर्दी कमी झाल्यावर डॉक्टर एकटेच आहेत असें पाहून त्या परिचारिकेनें म्हटलें—

'नरसीला विजेचा शॉक् कसा बसला हें कळलं का आपणाला डॉक्टरसाहेब?'

डॉ. दीनानाथ केसिस लिहिण्यांत गुंतले होते, परिचारिकेच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून लिहितां लिहितां त्यांनीं म्हटलें,

'कळेल सावकाश. काय घाई आहे? तो पोरगा विचारा घाबरला आहे. त्याला चांगला शांत होऊं दे. मग सावकाश विचारतां येईल.' डॉक्टरांची ही अनाठायीं दया पाहून तिनें कांहींशा रागानें म्हटलें—

'दया करण्याच्या लायकीचा तो पोरगा नाहीं. नसतं संकट आहे तें.' डॉक्टरनीं चमकून वर पाहिलें नि म्हटलें, 'कां हो? काय झालें?' परिचारिकेनें संतापानें म्हटलें, 'अडाणी गांवढळ मेला. आकाशांतली वीज दिव्यांत कशी भरते त्याचा शोध लावायला गेला होता.'

आणि मग तिनें त्याचा सारा पराक्रम त्यांना निवेदन केला. ती हकिकत ऐकत असतांना डॉक्टर मनाशीं सारखे हंसत होते.

परिचारिकेनें म्हटलें, 'ही नसती पीडा हवी आहे कशाला

अनुक्रम ....... विभाग ....... क्रमांक ....... दि.

साहेब? जाऊं दे त्या पोराला आपल्या बापाकडे.'

डॉक्टरनीं हंसून म्हटलें, 'त्याच्या बापाचा पत्ता तुम्हांला माहीत असला तर पाठवून देऊं त्याला.'

'काढील शोधून तो. गवळ्याच्या पोराला रानोमाळ भटकायची संवय असते.'

डॉक्टर हंसले नि म्हणाले, 'संवय काय लावावी तशी लागते.'

डॉक्टर हंसत हंसत असे उद्गार काढूं लागले कीं सांगणाराचा एक शब्दसुद्धां मनावर घेण्याची त्यांची इच्छा नसते हें आतां अनुभवानें त्या परिचारिकेला चांगलें कळून चुकलें होतें. आणि मग अशा वेळीं ती मनाशीं म्हणे, 'तरुण माणसाचं मन म्हणजे अळवाचं पान! वडील माणसाचा उपदेश, अनुभवाचे, शहाणपणाचे बोल तिथें कधीं चिकटायचे नाहींत. या तरुण डॉक्टरची गडगंज वडिलार्जित इस्टेट आहे. एकटा जीव. नाहीं कुणाचा दाब कीं कुणाचा आव! पण उद्यां लग्न होऊन बायको घरांत आली कीं खुशीनें तिचें सर्व ऐकाल!

संध्याकाळीं डॉक्टर नरसीच्या खोलींत गेले तेव्हां सकाळीं मुद्दाम बनवलेल्या लांकडी फळ्यांच्या बिछान्यावर अंगाची जुडी करून गुडघ्यांत डोकें घालून नरसी डुलक्या घेत बसला होता. एकादें घायाळ पांखरूं पंखांत चोंच खुपसून बसतें ना? अगदीं तसाच बसला होता तो. त्यांनीं हांक मारली, 'नरसी!'

त्या हांकेसरशीं दचकून नरसीनें डोकें वर केलें आणि डोळ्यांवर घसरून आलेल्या बँडेजच्या पट्टीआडून समोर बघितलें. समोर डॉक्टर उभे आहेत हें पाहातांच त्याची घाबरगुंडी उडाली. सकाळीं परिचारिकेनें आपणांला धमकावल्याप्रमाणें हे डॉक्टरसाहेब आतां आपणांला हांकून द्यायला आले आहेत हें त्यानें ओळखलें. तो

ताडकन् उठला नि गयावया करीत त्यानें एकदम भोकांड पसरलें.

'साहेब, मला मारूं नगा. मला माझ्या बापाकड धाडा. मी नाइ आतां कदी दिव्याला हात लावणार. मारूं नगा मला—'

डॉक्टर त्याच्याजवळ गेले. त्याच्या पाठीवर हात फिरवीत मृदुपणें त्यांनीं म्हटलें,

'रडूं नकोस, मी तुला मारायला आलों म्हणून कुणीं सांगितलें? वेड्या, डॉक्टर कुणाला मारीत नाहींत. मार लागलेला असला तर त्याला औषध देऊन बरं करतात. घाबरूं नकोस. बैस या बिछान्यावर.'

नरसी थराथरा कांपत बिछान्यावर बसला. त्यानें हुंदके देत म्हटलें, 'मला माझ्या बापाकड पोंचवा.'

समजावणीच्या स्वरांत डॉक्टरनीं म्हटलें, 'तुझा बाप कुठल्या गांवाला आहे तें माहीत आहे का तुला?'

नरसीनें मान हलवली.

डॉक्टरनीं म्हटलें, 'नाहीं ना? मग कुठें कसें पोंचवायचें तुला? त्याला कुठं कामधंदा लागला म्हणजे इथं येऊन तो तुला घेऊन जाईल असं जातांना तो सांगून गेलाय ना? मग तो येईपर्यंत तुला इथंच राहिलं पाहिजे. आणि आतां या पुढें दिव्यांना हात लावूं नकोस.'

त्यानें हात जोडून म्हटलें, 'नाइ मा बाप, आतां नाइ हात लावणार.'

**शिक्षणाला सुरवात**

दुसरे दिवशीं सकाळीं दवाखान्यांत जाण्यापूर्वीं डॉक्टरनीं किसनला दुकानांत पाठवून एक पाटी पेन्सिल विकत आणवली. आणि त्यांनीं नरसीला हांक मारली. भीत भीत हलक्या पावलांनीं नरसी पुढील दारीं व्हरांड्यांत आला.

डॉक्टरनीं किसनला म्हटलें, ‘ तुला लिहितां वाचतां येतंय ना रे ?’

‘ जी साहेब. ’

मग मी हीं पाटीवर अक्षरें काढलीं आहेत, तीं दुपारपर्यंत नरसीकडून गिरवून घे. मी येईपर्यंत त्याला इथें व्हरांड्यांतच बसूं दे.’

दुपारीं डॉक्टर घरीं आले तेव्हां नरसी मांडीवर पाटी घेऊन कोपऱ्यांत बसला होता. त्यांना पाहातांच तो पाटी घेऊन चटकन् उभा राहिला. त्यांच्या सांगण्याप्रमाणें त्यानें पाटी पुसून कोरी कर-करीत केली आणि शिकवलेलीं अक्षरें वळणदारपणें नि व्यवस्थितपणें काढून दाखवलीं. डॉक्टर मनाशीं हंसले नि वर निघून गेले.

त्यानंतर मग चारपांच दिवसांनीं डॉक्टरनीं त्याला गांवातल्या प्राथमिक शाळेंत घातलें. त्याचें तें जीर्ण मुंडासं, फाटकं कुडतं नि लंगोटीची चिंधी केराच्या पेटींत गेली. आणि त्या जागीं निळी हाफ्-पँट, पांढरा शर्ट नि पांढरी टोपी हा सरंजाम आला. प्रत्यक्ष मालकाची कृपा घडल्यामुळें इतर नोकरांची अवकृपा आपोआपच दबली गेली. पहिल्या दिवशीं जिथें त्यानें पाटी हातांत धरली होती तो खालचा पुढचा व्हरांडा त्याची अभ्यासाची आणि झोंपण्या बसण्याची खोली बनली. शाळेच्या वेळापत्रकाबरोबर घरचं वेळापत्रकहि आपो-आप तयार झालं. सकाळीं लवकर उठून तो साऱ्या फुलझाडांना पाणी घाली. तें काम संपलं कीं लगेच बागेंतल्या नळावर आंघोळ करी, आणि साबू लावून कपडे धुऊन वाळत टाकी. सैपाकी देईल तें खाऊन दहा वाजतां शाळेंत पळे. संध्याकाळीं आला कीं व्हरां-ड्याच्या कोंपऱ्यांत पाटीदप्तर काढून अभ्यासाला बसे.

आतां घरीं तो अभ्यास करात असतांना अगर कांहीं काम करीत असतांना आसपास नजरेच्या टप्प्यांत कुठेंहि डॉक्टर दिसले

तर तो कांहींशा आदरयुक्त भीतीनें, किंचित् संकोचानें खाली मान घालून डोळ्याच्या कोंपऱ्यांतून त्यांच्याकडे टक लावून पहात राही. शाळेंत पुस्ती काढतांना पुढें ठेवलेल्या कित्त्यांतल्या अक्षरांवर तो अगदीं अशीच टक लावीत असे. आपण शिकून हुशार व्हावें, त्याचप्रमाणें आपल्या जीवनालाहि चांगलें वळण लागावें अशा सुप्त आकांक्षांचे अंकुर त्याला नकळत त्याच्या मनांत हळू हळू वाढत होते.

हळू हळू तो वाढत होता. वाढत्या वयाबरोबर त्याचें चालणें बोलणें नि वागणें त्याच्या अक्षरासारखेंच रेखीव, आकर्षक बनत चाललें होतें. देठावर वाकलेल्या कमळाच्या कळीप्रमाणें पूर्वी त्याचं डोकं सदा खालीं असे. पण आतां तें सूर्यफुलांप्रमाणें ताठ होऊं लागलें होतें. मुद्रेवरचा भित्रेपणा आणि वेंधळेपणा लुप्त होऊन तिथें आतां चलाखीची चमक दिसूं लागली होती. प्रसन्नतेचा प्रकाश पसरूं लागला होता. केव्हां कुठं, कसें वागावें याचें तारतम्य ज्ञान त्याला आतां होऊं लागलें होतें.

× × +

**बापाचें पत्र**

अशा तऱ्हेनें दिवसामागून दिवस कसे भराभर जात होते. दीड वर्षानंतर एक दिवस नरसीच्या बापाचें डॉक्टरांना पत्र आलें. भगत गवळी स्वतां अडाणी, अशिक्षित असल्यामुळें त्यानें कुणाकडून तरी तें लिहून घेतलें होतें. पत्रांत त्यानें लिहीलें होतें. ‘ अन्नपाण्यासाठीं एका गांवाहून दुसऱ्या गांवाला जातां जातां वाटेंत अनेक गाई भुकेनें आणि तहानेनें तडफडून मेल्या. कित्येक गाई गांवोगांवच्या लोकांना फुकट देऊन टाकाव्या लागल्या. बऱ्याचशा गाई ठिकठिकाणच्या पांजरपोळांनीं ठेवून घतल्या. भगत गवळ्याच्या

दोन गाई मेल्या. बाकीच्या त्यानें पांजरपोळला देऊन टाकल्या होत्या. मुंबईला चांगला कामधंदा मिळतो असें कळल्यामुळं त्यांतले कांहीं गवळी मुंबईला गेले. त्यांच्याबरोबर भगत गवळी पण गेला. हे गवळीं लोक मुंबईला गेले खरे, पण तिथें चांगल्या शिकलेल्या लोकांना कामधंदा मिळण्याची मारामार, तिथें या अडाणी गवळ्यांना कोण काम देणार ! अनेक ठिकाणीं पायपिटी केल्यानंतर आणि अनेक दिवस उपासमार घडल्यानंतर शेवटीं एका वसईवाल्याला दया येऊन त्यानें आपल्या गवळी वाड्यांत भगत गवळ्याला कामाला ठेवलें होतें. आतां आपल्या गांवीं परतण्याची त्याला ओढ लागली होती. पण वाटखर्चाला तर पैसे हवेत ना? शिवाय नुसता गांवीं जाऊन करणार काय? पोटापाण्याची कांहीं व्यवस्था बघायला हवी ना? गांवी जाऊन स्वतःची उपजीविका चालवण्यासाठीं एकादी गाय अगर म्हैस खरेदी करण्याइतके पैसे सांठविल्याशिवाय गत्यंतर नव्हतं. तेवढे पैसे सांठायला किती महिने—महिने कसले वर्षेंच—लागतील याचा नेम नव्हता. आपल्या गांवीं जातांना नरसीला आपण घेऊन जाऊं. तोपर्यंत त्याला सांभाळण्याची त्यानें डॉक्टरांना विनंति केली होती.'

डॉक्टरनीं दिलेलें तें पत्र नरसीनें वाचलें. बापाच्या आठवणीनें त्याचे डोळे भरून आले. त्याच्या उपासमारीचें, हालाचें वर्णन वाचून त्याचें मन बेचैन झालें. पत्र घेऊन तो बाहेर बागेच्या एका कोपऱ्यांत जाऊन बसला आणि पोटभर रडला. थोड्या वेळानें डॉक्टरनीं हांक मारली तसा तो डोळे पुसून आंत आला. त्यांनीं दोन आण्याचं तिकीट चिकटवलेलें एक पाकीट दिलें आणि भगत गवळ्याला पत्र लिहायला सांगितलें. नरसीनें आपल्या सुवाच्य, रेखीव अक्षरांत बापाला लांबलचक पत्र लिहीलें. आयुष्यांत स्वतःच्या

हातानें लिहिलेलें तें पहिलें पत्र पोस्टाच्या पेटींत टाकण्याआधीं तो ते पत्र मोठ्या अभिमानानें कितीतरी वेळां उलट सुलट फिरवून पाहात होता.

× × × ×

**जातीपेक्षां गुण श्रेष्ठ**

दुसरी पास होऊन तिसरींत गेल्याचा निकाल ज्या दिवशीं नरसीला कळला त्याच दिवशीं घरीं आल्यावर दुसरी एक बातमी त्याला समजली. ती बातमी इतरांना मोठी आनंदाची वाटली तरी आपणांला ती आनंदनीय होणार कीं हानिकारक ठरणार आहे हें मात्र त्याला समजेना. त्या दिवशीं संध्याकाळीं शाळेंतून आनंदानें उड्या मारीत घरीं आला तेव्हां हरिभटजीनें म्हटलें, 'नरसी भगत, फार उड्या नका मारूं. इतके दिवस तुमचे लाड होत होते, पण ते आतां संपले.'

नरसीनें गोंधळून विचारलें, 'म्हणजे काय?'

'अरे, आतां बाईसाहेब येताहेत या घरांत.'

'बाईसाहेब? बाईसाहेब कोण?'

'हत्, अकलेच्या कांद्या! डॉक्टरसाहेबांचं लग्न होणार आहे. आतां येत्या रविवारीं मुंबईला निघाले आहेत ते. डॉक्टरसाहेबांनीं ही फुकटची धर्मशाळा करून ठेवलेय. जो कोणी तोंड वेंगाडत येईल त्याला ठेवून घेतात, जेवायला देतात. पण आतां बाईसाहेब आल्यावर चट् सारें बंद होईल. मग जा वसईला बापाकडे नि दुधाच्या कावडी घे खांद्यावर.'

नरसी एकदम खिन्न झाला. पास झाल्याचा त्याचा आनंद कुठल्याकुठें उडून गेला. रात्रीं तो बिछान्यावर पडला पण त्याला झोंप येईना. खालीं अगदीं जमिनीपर्यंत असलेल्या व्हरांड्याच्या

लाकडी जाळीच्या भिंतींतून चांदणें त्याच्या अंगावर पडलें होतें. समोर आकाशांतला चंद्र झोंपल्या झोंपल्या बिछान्यांतून दिसत होता. रोज या चंद्राकडे तो टक लावून बघत राही. त्याच्याकडे बघतांना त्याला 'रामाचा चंद्रासाठीं हट्ट' हा धडा आठवे. वर्गांत शिकवलेल्या चंद्रावरच्या कविता तो गुणगुणे. पण आज त्याला यापैकीं कांहीं सुचेना. समोरचा चंद्र, अंगावर पसरलेलें शुभ्र चांदणें—कांहींएक नकोसें झालें त्याला. त्यानें डोळ्यावर पांघरूण ओढून घेतलें. पांघरुणाच्या आंत काळोखांत तो डोळे उघडून पाहूं लागला. आज सबंध वर्गांत आपला पांचवा नंबर आला, तेव्हां मास्तरनीं आपणांला किती शाबासकी दिली होती! आणि ते म्हणाले नव्हते का— 'नरसी मोठा भाग्यवान मुलगा आहेस तूं! देवाच्या दयेनें डॉ. दीनानाथांसारख्या उदार माणसाचा तुला आश्रय मिळाला आहे. ते कल्पवृक्ष आहेत. त्यांच्या उपकाराचं चीज कर. चांगला शीक. शिकून काम्पाउंडर झालास तर डॉ. तुला कायमचे आपल्याजवळ ठेवून घेतील.'

आपल्या या शिक्षकाच्या अमोल उपदेशामुळें आपलें मन किती उल्हसित झालें होतें! त्यांचे बोल मनांत ठसवीत आपण मोठ्या आनंदानें उड्या मारीत घरीं आलों होतों. आपण शिकून नोकरी करूं. मग आपल्या बाबाला घरीं पैसे पाठवूं. कितीतरी असे बेत आपण केले होते. डॉक्टरांचं हें लग्न म्हणजे आपल्या साऱ्या बेतांत विघ्न आहे असेंच त्याला वाटूं लागलें.

\+ \+ \+ \+

मुंबईला लग्न उरकून पंधरा दिवसांनीं डॉ. दीनानाथ पत्नीसह परत आले. इतर नोकरांबरोबर नरसी पण त्यांचें स्वागत करण्यासाठीं स्टेशनवर गेला होता. डब्यांतून खालीं उतरतांच त्यानें

डॉक्टरीणबाईंकडे निरखून बघितलें. पण माणसाला नुसतें असें बघून कधीं त्याचा स्वभाव कळतो का? डॉक्टरीणबाई दिसायला गोऱ्यागोऱ्या पान नि फार सुंदर आहेत, एवढंच त्याला कळलें.

दुसऱ्या दिवसापासून तो कांहींसा भीत भीत आणि जपून वागूं लागला. हो. करतां काय? फट् म्हणतां बाईसाहेबांचा मिजास जायचा आणि आपली हाकालपट्टी व्हायची. दुसऱ्याच्या मनाचा कल बघून केव्हां कसें वागावें याचें तारतम्य ज्ञान त्याला आलेलें होतें. दुसऱ्याच्या हृदयांत शिरून त्याला प्रिय कसें व्हावें हें आतां तो अनुभवानें शिकला होता.

थोड्याच दिवसांत त्याला समजून आलें कीं डॉक्टरीणबाईंचा स्वभाव मोठा मायाळू आहे. नोकरांना सुद्धां त्या प्रेमानें वागवतात. उठल्या बसल्या हुकूम सोडीत नाहींत. आपल्या शाळेची वेळ त्यांच्या लक्षांत राहाते. त्या वेळीं आपण कामांत गुंतलों असलों तर त्या लगेच म्हणतात, 'नरसी, तुझी शाळेची वेळ झालीय ना? राहूं दे तें काम. किसन करील. जेवून तूं शाळेंत जा बघूं.'

सकाळीं त्या उठल्याबरोबर आपण आधींच तोडून ठेवलेलीं गुलाब, मोगऱ्याचीं फुलें त्यांना नेऊन दिलीं म्हणजे त्या किती शाबासकी देतात! संध्याकाळीं शाळेंतून आल्याबरोबर जाईजुईची फुलें तोडून गजरा करायला आपण त्यांच्यासाठींच शिकलों नाहीं का?

× × × ×

त्या दिवशीं रविवार होता. दवाखान्याला सुट्टी असल्यामुळें संध्याकाळीं डॉ. दीनानाथ बागेंत आपल्या पत्नीबरोबर गप्पा मारीत बसले होते. नरसी रोजच्या क्रमाप्रमाणें जाईच्या मंडपाआड गजरा करीत बसला होता. डॉक्टर पतीपत्नीचें बोलणें वाऱ्याच्या झुळुकीबरोबर त्याला ऐकूं येत होतें. डॉक्टरीणबाई म्हणत होत्या– 'हे

एवढे नोकर हवेत कशाला ? '

डॉक्टरनीं हंसून म्हटलें, ' कशाला म्हणजे ? तुझ्या दिमतीला.'

डॉक्टरीणबाईंच शब्द ऐकूं आले, ' माझ्या नकोत दिमतीला एवढे. त्यांतले मी कांहीं कमी करणार आहे. '

ते शब्द कानीं पडतांच नरसीच्या छातींत धस्स झालें. फुलांच्या देठांत घातलेली सुई टचकन् त्याच्या बोटाला टोचली. म्हणजे हरिभटजी म्हणाला होता तें खरें ठरणार तर ! नोकर कमी करणार म्हणजे कोण ? हरिभटजी तर सैंपाकाला हवा. किसन जुना नोकर म्हणून तो राहाणारच. राहितां राहिलों आपण. तेव्हां पाळी येणार आपणावरच.

तितक्यांत डॉक्टरीणबाईंचे शब्द त्याच्या कानीं पडले. ' आतां मी आलेय तेव्हां सैंपाक्याची काय जरूरी आहे ? '

डॉक्टरनीं हंसून म्हटलें–' तूं आलीस म्हणून त्या बिचाऱ्या सैंपाक्याच्या पोटावर पाय कां ? '

डॉक्टरीणबाईंनीं म्हटलें, ' मी कांहीं त्याचें नुकसान करायला नाहीं सांगत. त्याचा फायदा होईल असेंच करणार आहे. तुमच्या हॉस्पिटलसाठीं एक सैंपाकी हवा आहे ना तुम्हांला ? तिथें त्याला ठेवा. '

' इथें तुला कोण मदत करील ? '

सैंपाकघरांत नरसीला घेईन मी माझ्या मदतीला. आपली शाळा नि अभ्यास संभाळून तो मदत करील. मोठा चलाख नि धोरणी मुलगा आहे. त्याची टापटीप नि स्वच्छता आपल्या ब्राह्मणाच्या मुलांतसुद्धां एवढी मिळायची नाहीं. '

ते शब्द ऐकतांच नरसीचें हृदय हर्षानें फुललें. आनंदाच्या भरांत गजरा हातभर लांब होत चाललाय हें पण त्याच्या लक्षांत

आलें नाहीं. मग त्याला वाटलें अशींच आणखी फुलें ओवून याचा मोठा हार बनवावा आणि डॉक्टरणिबाईंच्या गळ्यांत घालून त्यांच्या पायावर डोकें ठेवावें. तो मनाशीं हंसला, उरलेलीं फुलें त्यानें परडीत टाकलीं आणि तो लांबलचक हार तोडून त्याचे दोन गजरे बनवले.

गृहव्यवस्थेसंबंधीची ही बातमी हरिभटजीला जेव्हां समजली तेव्हां त्यानें आश्चर्यानें पण अंतर्यामीं रागानें डॉक्टरणिबाईंना म्हटलें, 'पण बाईसाहेब, नरसी गवळ्याचा पोर आहे. तो आपल्या ब्राम्हणाच्या सैंपाकघरांत— '

डॉक्टरीणबाईंनीं मध्येंच म्हटलें, 'हरिभटजी, कृष्ण कोण होता हो? गवळ्याचाच पोर ना? मग त्याला देव्हाऱ्यांत ठेवून तुम्ही त्याची पूजाअर्चा कशी करतां हो? माणूस हा जातीपेक्षां गुणांनीं श्रेष्ठ बनतो.'

हरिभटजी गेल्यावर नरसी डॉक्टरीणबाईंना सैंपाकघरांत मदत करूं लागला. शाळेचा आणि घरच्या अभ्यासाचा वेळ सोडून सारा दिवस तो डॉक्टरीणबाईंच्या मागें मागें छायेप्रमाणें राही. त्या येण्यापूर्वीं बंगला एकाद्या धर्मशाळेसारखा वाटे. देवळांत मूर्ति स्थापन केल्यानंतर त्या देवळाला जशी शोभा येते तशी आतां त्या बंगल्याला मोठी शोभा आली होती.

त्या प्रसन्न मोकळ्या वातावरणांत नरसीचे दिवस वाऱ्याच्या वेगानें जात होते. दिवसागणिक तो भराभर वाढत होता. वाढत्या वयाबरोबर त्याचे सारे गुण विकास पावत होते.

तो चौथी पास होऊन इंग्लिश पहिलींत गेला त्या वर्षीं डॉक्टरांच्या घरीं नवीन बाळाचा जन्म झाला, आणि घरची शोभा द्विगुणित झाली. आतां घरांत काम करण्यासाठीं डॉक्टरीणबाईंनीं एक बाई ठेवली असल्यामुळें आपला अभ्यास सांभाळून छोट्या नंदकुमाराला खेळवणें आणि बाहेरची किरकोळ कामें याशिवाय

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा
दा. क्र ... नों दि ...
वि. ... अनुक्रम ... विभाग ... क्रमांक



त्याला दुसरें कांहीं करावें लागत नसे.

अलिकडे संध्याकाळीं तो शाळेंतून घरीं आला कीं कामकाज आटोपून दवाखान्यांत पळे. गुणी असल्यामुळें तो डॉक्टरांचा लाडका होता. शिवाय हुशार, धोरणी नि कामसू असल्यामुळें दवाखान्यांत ह्याचें चांगलें स्वागत होई. तो तिथें गेला कीं कधीं काम्पाऊंडरच्या विभागांत तर कधीं ड्रेसिंगच्या विभागांत एका बाजूला बांकावर बसून तिथें चाललेलीं कामें लक्षपूर्वक पाही.

\+ + + +

**वडिलांची भेट**

एक दिवस सकाळीं तो नंदकुमारला बाबागाडींत बसवून बागेंत फिरवीत होता. तितक्यांत भगत समोरच्या उघड्या फाटकां-तून आंत आला. नरसीनें आपल्या बापाला चटकन् ओळखलें. पण पांढराशुभ्र पायजमा आणि शर्ट घातलेला, नीटनेटके केस वळवलेला हा उंच सुदृढ आणि तरतरीत मुलगा आपला नरसीच आहे हें त्याला आधीं खरेंच वाटेना. बाबागाडी एका बांकाजवळ उभी करून नरसीनें आपल्या बापाला हाताला धरून बांकावर बसवलें आणि तो स्वतः त्याच्याजवळ बसला. मुलाच्या तोंडून एकंदर हकिकत ऐकत असतांना बापाचें हृदय आनंदानें भरून आलें.

मग नरसी त्याला घेऊन डॉक्टरीणबाईकडे गेला. त्यांनीं त्याची आस्थेवाईकपणें विचारपूस करून चहा आणि खाणें करून दिलें. त्याची हकिकत विचारून घेतल्यावर त्यांनीं म्हटलें–

'मग काय भगतबाबा नरसीला घेऊन जाणार का?'

खरं म्हणजे भगतबाबा त्याच हेतूनें आला होता. पण आपल्या मुलाची ही सुस्थिति पाहून मुलाला घरीं नेण्याचा त्याचा विचार कुठल्याकुठें पळाला. त्यानें हात जोडून म्हटलें–'नाई बाईसाहेब,

इथंच आपल्या पायांशीं तो वाढूं दे. शाना होऊं दे. अजून गांवाकडे नीट झुंपडीबी उभी केली नाई. हाताशीं गुरं नाईत. या पोराला त्या फुफाट्यांत नेऊनशान काय करूं? आपुनच त्याला सांभाळा.'

डॉक्टरीणबाईंनीं हंसून म्हटलें, 'भगतबाबा, तुम्ही त्याची बिलकूल काळजी करूं नका. आमच्या इथें तो खुशाल वाटेल तितके दिवस राहूं दे. तुम्ही त्याला मधून मधून येऊन भेटत जा.'

दुसरे दिवशीं आपल्या मुलाचा निरोप घेऊन नि डॉक्टर-साहेबांनीं दिलेले पंचवीस रुपये मुंडाशाच्या पदराला बांधून तो समाधानानें आपल्या गांवीं गेला.

नरसीचे दिवसहि सुखासमाधानानें जात होते. पाण्यांत टाक-लेला साखरेचा खडा हळू हळू विरघळून त्यांत मिळून जावा त्या-प्रमाणें डॉक्टरांच्या कुटुंबीय जीवनाशीं तो हळू हळू एकरूप होत चालला होता. ती मंडळी पण त्याला आपल्या कुटुंबांतलाच मानूं लागली होती. दोन अडीच वर्षांचा छोटा नंदकुमार त्याच्यामागें दुडुदुडु धांवत 'नलशी, नलशी' म्हणून हांका मारूं लागला कीं डॉक्टरीणबाई त्याला पकडून लटक्या रागानें दटावून म्हणत—

'नंदू, मार देऊं का? काय म्हणायचं त्याला?'

'नलशीदादा.'

'मग चल. हात जोड नि चुकलों म्हण बघू.'

तो चटकन आपले चिमुकले हात जोडी. पण त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडण्यापूर्वींच नरसी चटकन् त्याला उचलून घेई आणि प्रेमानें छातीशीं कवटाळीत तिथून निघून जाई.

+ + +

नरसी आपला शाळेचा अभ्यास सांभाळून हळू हळू

दवाखान्यांत चालणाऱ्या कामकाजांत जास्त लक्ष घालूं लागला. थर्मामीटर लावून तापमान बघणें, एनिमा देणें, ड्रेसिंग करणें अशा कितीतरी प्राथमिक गोष्टी तो आतां शिकला होता. मॅट्रीकची परीक्षा झाल्याबरोबर तो काम्पाउंडरचें काम शिकूं लागला. एका वर्षाच्या आंतच काम्पाऊंडरची परीक्षा पास झाला आणि डॉ. दीनानाथ यांच्या हाताखालीं दवाखान्यांत काम्पाऊंडचें काम करूं लागला. हे काम करतां करतां जेवढें ज्ञान मिळवितां येईल तेवढें तो आत्मसात करूं लागला. डॉ. परगांवीं व्हिजीटला निघाले कीं त्यांची बॅग भरून त्यांच्याबरोबर जाण्यासाठीं तो सुसज्ज होई. दवाखान्यांत असो कीं घरीं असो कामाच्या वेळीं तो सदोदीत त्यांच्याबरोबर राही. त्याची ही तत्परता नि निष्ठा पाहून एक दिवस डॉक्टरीणबाईंनीं हंसून चेष्टेनें आपल्या पतीला म्हटलें—

‘ धनुष्यबाण घेऊन श्रीरामाबरोबर चालणाऱ्या लक्ष्मणासारखा नरसी बॅग घेऊन अगदीं सदा तुमच्या मागोमाग सावलीसारखा असतो.’

डॉक्टरनीं हंसून म्हटलें, ‘ पण तो या सीतेच्या दिमतीत अधिक वेळ असतो हें नाहीं वाटतं तुझ्या लक्षांत आलें ? ’

एकंदरींत नरसीचा आयुष्यक्रम मोठ्या आनंदांत चालला होता. डॉ. पतिपत्नी दोघेहि त्याला मुलाप्रमाणेंच मानीत होते, त्याचप्रमाणें वागवीत होते. तोहि त्यांच्या कौतुकाचें, प्रेमाचें चीज करून दाखवीत होता. त्याचें जीवन शांत सागरासारखें चाललें होतें.

= = = =

**वादळ—**

एक दिवस दुपारीं तो दवाखान्यांतून काम आटपून घरीं आला नि पहातो तो आंत पुढच्या व्हरांड्यांत भगत गवळी बसलेला. दर दोन तीन वर्षांनीं तो आपल्या मुलाचा समाचार घेण्यासाठीं

येत असे. नरसीनें बापाचें हंसून स्वागत केलें, घरची विचारपूस केली आणि मग जेवणें आटोपल्यावर बापाला घेऊन तो बागेंत गेला. तिथें झाडाच्या सावलींत असलेल्या बाकावर दोघे बापलेक बसले.

भगत गवळ्यानें म्हटलें, 'नरसी, आतां घराकडे कवा येनार?'

भगत गवळ्याला मुंबईहून आपल्या गांवीं जाऊन सहा वर्षें होऊन गेलीं होतीं. नरसी अद्याप आपल्या गांवाकडे जाऊन आला नव्हता. जाऊन तरी करणार होता काय? त्याचा बाप दुसऱ्याकडे काम करणार नि तिसऱ्याच्या ओट्यावर झोंपणार. पण गेल्या वर्षी त्यानें लहानशी झोंपडी बांधली होती. दोन गाई घेतल्या होत्या. तेव्हां आतां दोन दिवस जाऊन राहिलें तर पोटापुरती भाकरी नि दुधदुभतं मिळण्याची वाण नाहीं. तेव्हां नंदकुमाराला घेऊन चार दिवस रजा काढून जाऊन यावें असा नरसीनें विचार केला नि म्हटलें,

'डॉक्टरसाहेबांच्या मुलाला रजा पडली म्हणजे चार दिवस येऊन जातों. एकदां गांवाकडे येऊन जायला हवं खरं.'

म्हाताऱ्यानें रागीट स्वरांत म्हटलें, 'म्हंजे! चार दिस काय तिथं पाव्हन्यावानी येनार हायेस, व्हय रे पोरा? आतां हितं ऱ्हायाची कायबी गरज नाई, गांवाकडे झुंपडी बांधलेली हाये, गुरं हायेत. समदं हाये.'

आपणाला इथून कायमचे घेऊन जाण्याच्या विचारानें आपला बाप इथें आज आला आहे हें पाहतांच तो दचकला. त्या खेड्यांत जाऊन तिथें कायमची राहाण्याची कल्पना त्याला अप्रिय आणि दुःखदायक वाटली. शांत सागरासारख्या जीवनांत आपल्या बापानें वादळ आणलें हें पाहून तो चिडला. त्यानें चढ्या आवाजांत म्हटलें,

'गांवाकडे येऊन मी काय करूं तिथें? तिथें येऊन गाई राखीत बसूं कीं गोवऱ्या थापीत बसूं?'

'गुरं नग राखूस. तीं राख असं कोण म्हनतूया. तूं आपला निसता राजावानी बसून खा.'

नरसीनें संतापानें म्हटलें, 'राजावानी बसून काय खाऊं? म्हशीचं आंबोण, कडबा कीं पेंड? बाबा, तुम्हांला काय वेड लागलंय काय? इथें मी शहरांत चांगले पैसे मिळवायला लागलों आहे, ते सोडून मला तुम्ही त्या खेड्यांत चल म्हणतां? आज तुम्ही झोंपडी बांधलेयत, गाई, म्हैस घेतलेयत तीं काय पैशाशिवाय फुकट मिळालीं तुम्हांला? मी इथें राहिलों तर चार पैसे तुमच्या नजरेला पडतील. गांवाकडे आलों तर दहाची एक नोटसुद्धां बघायला नाहीं मिळायची.'

म्हाताऱ्यानें कळवळून म्हटलें— 'तुझ्यापरीस पैसे अधिक हायेत काय मला? मला पैसे नकोत पोरा.'

नरसीनें रागानें म्हटलें—'तुम्हांला नको असतील. पण मला हवेत ना? तुम्ही म्हातारे झालांत, पण मी नाहीं अजून म्हातारा झालों. मी तुम्हांला स्पष्ट सांगून टाकतो कीं गांवाकडे राहायला येणार नाहीं.'

म्हाताऱ्यानें दोन्ही हातांनीं डोकें गच्च दाबून धरलें नि म्हटलें, 'खरं हाय बाबा तुजं बोलनं. नग येऊस, ऱ्हा हितं.'

नरसीला वाटलें कीं बापाला आपलं म्हणणं पटलें, त्याचा राग शांत झाला. त्यानें समजुतीच्या स्वरांत म्हटलें—

'बाबा, आतां खूप म्हातारे झालांत तुम्ही. थकलांत, ही धंद्याची दगदग आतां सोडून द्या आणि हरि हरि करीत स्वस्थ बसा.'

कांहीं उत्तर न देतां भगत गवळी स्वस्थ बसला. न जाणों बाप पुन्हां आपणांस घरीं नेण्यासाठीं हुज्जत घालीत बसेल म्हणून नरसी चटकन् उठला. नि आंत आपल्या खोलींत गेला. थोड्या वेळानें

बाहेर जाण्यासाठीं कपडे करून तो भगत गवळ्याजवळ आला. खिशांतून दहा दहाच्या दोन नोटा बापापुढें करून त्यानें म्हटलें,

‘ मी बाहेर कामाला चाललोंय. तुम्हांला गांवाकडे कांहीं सामान न्यायचं असलं तर आतां जाऊन खरेदी करून या. ’

नोटाकडे न बघतां भगतनें म्हटलें, ‘ नग, नग, गांवाकडे समद हाय. सोसायटीचं नवीन दुकान झालंय, त्यांत समदा माल सस्त मिलतो. ’

‘ मग गावांकडे घेऊन जा हे पैसे. होतील खर्चाला. ’ आपलें मुंडासं दोन्ही हातांनीं चाचपीत भगतनें म्हटलें, ‘माझ्याकडे ठिवाया जागा नाई. ऱ्हाऊं दे तुझ्याकडं. सकाळीं जातांना घेईन. ’

नरसीनें त्या नोटा आपल्या पॅंटच्या खिशांत कोंबल्या आणि तो फाटकाबाहेर पडला.

× × +

**भगत गवळ्याची मनःस्थिति—**

नरसी निघून गेला तरी भगत गवळी खालीं मान घालून शून्य मनानें कितीतरी वेळ बसला होता. मग त्यानें मान वर केली. समोर रस्त्यापलीकडच्या मैदानाकडे त्याची नजर गेली. याच मैदानावर बारा वर्षांपूर्वी तो एका रात्रीं आला होता. याच मैदानावर आपल्या हातानें वाढवलेल्या दोन गाई मेल्या होत्या. त्या मेलेल्या गाईंना सोडून आपणांला तसेंच जावें लागलें होतें. आज पोटचा पोरगा चांगला असून त्यालाहि असेंच सोडून जावें लागत आहे. अंगांतल्या कुडत्याच्या टोकानें त्यानें डोळे टिपले. ‘ देवाची मरजी! कुठंबी सुखी ऱ्हाऊं दे ! ’ म्हणत तो उठला. मुंडासें सोडून पुन्हां नीट बांधलें आणि तो घरांत आला. पुढच्या व्हरांड्यांत कोंपऱ्यांत ठेवलेली पिशवी, घोंगडी, काठी वगैरे आपलें सर्व सामान नेण्याच्या

तयारीनें आवरून ठेवलें आणि तो आंतल्या दालनाच्या दाराशीं गेला. आंत डोकावून पहात त्यानें म्हटलें—

‘ बाईसाहेब, साहेबास्नी झोंप लागलेय काय ? ’

‘ कां हो भगतबाबा, कांहीं काम होतं का ? ’

‘ नाई बा, काय नाई. पर गांवाकडं जाया निगालोय तवां साहेबास्नी इचारून जावं म्हणतुया. ’

‘ म्हणजे ? दोन दिवस राहाणार होतां ना ? ’

‘ पर बाईसाहेब, तिकडं गुराकडं बघाया कुनी न्हाई तवां जायला होवं. ’

‘ बरं थांबा हं, पाहून येते. ’

थोड्या वेळानें तो वर दिवाणखान्यांत गेला तेव्हां कोचावर पडल्या पडल्या डॉक्टर पुस्तक वाचीत होते. त्यांनीं म्हटलें—

‘ या भगतबाबा, कसं काय चाललंय गांवाकडे ? ’

‘ समदं ठीक आहे, आपल्या कुरपेनं साहेब. ’

‘ किती गुरं आहेत ? ’

‘ दोन गाई हायेत, एक म्हैस घेतलेय. ’

‘ अरे वा ! चांगला जम बसवलांत धंद्याचा. मग आतां नरसीला केव्हां नेणार ? आतां त्याचें शिक्षण संपलंय. त्याला आतां न्यायला हरकत नाहीं. ’

हें ऐकतांच म्हाताऱ्याचा चेहरा खरकन् उतरला. दीर्घ निःश्वास टाकून त्यानें म्हटलें, ‘ साहेब, तो गांवाकडे यायला खुशी नाहीं. ’

‘ खुशी नाहीं ? असं कसं ? तुम्ही त्याला विचारून बघितलंत का ? ’

म्हाताऱ्यानें मान हलवली. त्यानें म्हटलें, ‘ तो म्हनतोय मी हितं शहरांत ऱ्हाऊन शिकलों, शानासुर्ता झालों तो आतां खेड्यांत

येऊनशान काय शेनाच्या टोपल्या उचलूं ? मी म्हणालों, ' काय बी काम करूं नगस. राजावानी बसून खा. पण माज्याजवळ ऱ्हा. '

' मग ? '

' पर ऐकत नाई. साहेब, मी ममईला चार वरसं घाम गाळून दोन पैसे जमवले, गांवाकडं आशेनं आलो. हितं दोन गुरं घेतली. झुंपडी उभी केली. इतकं कशापायीं केलं साहेब ? मला आशा व्हती, चार दिशेला पांगलेलीं माजी पोरं मोठी होऊन, शानीसुरती बनून गांवाकडं येतील. एक जागीं गुन्यागोविंदानं ऱ्हातील. माजं घर सुना-पोराबाळांनीं गोकुळावानी भरून जाईल. '

' बाकीचे मुलगे कुठें आहेत तुमचे ? '

' काय सांगूं साहेब, मोठा ममईला गिरनीत ऱ्हायलाय. मंमईकर झालाय. मधला एका गुजराती शेटबरोबर कलकत्त्याला गेलाय. या धाकट्या पोरावर माझा लई जीव व्होता. हाये बी गुनाचा, शिकून शानासुरता होऊन घरीं येईल. पन-पन तोबी नाई म्हनतो. दुष्काळांत गुरं मेलीं. पोटची पोरं असून मेल्यागत जाली. गुरं मेली तवां नवीन घेतली. पन आतां नवीन पोरं म्हातारपनी, ती बी आशा न्हाई— '

बोलतां बोलतां म्हाताऱ्याचा कंठ भरून आला. त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले.

डॉक्टरनीं म्हटलें, ' भगतबाबा, रडूं नका. नरसीला मी समजावीन. तो घरीं येईल, कायमचा तुमच्याजवळ राहील नि तुमची सेवा करील. तुम्ही निराश होऊं नका. '

म्हाताऱ्यानें पटकन् बसल्या जागीं जमिनीवर डोकें टेकलें नि म्हटलें —' देवच तुमच्या रूपानें भेटला. साहेब दया करा आणि माज्या पोराला समजावा, मी उद्यां येऊन जातो. '

डॉक्टर मनाशीं विचार करतां करतां हंसले आणि म्हणाले, ' असे उतावीळ होऊं नका भगतबाबा. त्याला समजावून तयार करायचं म्हणजे मोठ्या युक्तीनें तें काम केलं पाहिजे. त्याला घरीं न्यायचा तुमचा विचार मला कळलाय हें त्याला समजून उपयोगी नाहीं. '

मंग कसं करायचं ? '

' तें मी पाहातो. तुम्ही असं करा, तुम्ही एकटे घरीं जा, आठ दिवसांनीं मी तुम्हांला पत्र घालीन तेव्हां या. मग त्या वेळीं तो तुमच्याबरोबर येईल. पण आतां या बाबतींत त्याला कांहीं बोलूं नका. '

दुसऱ्या दिवशीं नरसीचा निरोप घेऊन भगतबाबा मोठ्या आनंदानें घरीं गेला. नरसीला वाटलें बापाला आपलें म्हणणें पटलें. त्यामुळें तोहि मोठ्या आनंदांत होता.

× × × ×

**नरसीचा हृदयपालट**

भगतबाबा गेल्यावर चौथे दिवशीं रात्रींची गोष्ट. डॉ. दिनानाथ बगिच्यांत पारिजातकच्या झाडाखालीं चांदण्यांत आरामखुर्चींत पडले होते. व्हरांड्यांत नरसी नंदकुमाराबरोबर पत्ते खेळत बसला होता. तेवढ्यांत डॉक्टरनीं त्याला हांक मारली. एखाद्या रोगासंबंधीं अगर तपासलेल्या रोग्यासंबंधीं कांहीं नवीन माहिती सांगायची असली म्हणजे ते त्याला अशाच शांत वेळीं बोलावित. हांक कांनीं पडतांच नरसी झटकन उठला नि बाहेर बागेंत गेला. आणि पारिजातकाच्या भोंवती बांधलेल्या दगडी पाराजवळ येऊन अदबीनें उभा राहिला.

डॉक्टरनी म्हटलें, ' बैस. '

तो बसला तरी थोडा वेळ डॉक्टर स्तब्धच होते. मग त्यांनीं

म्हटलें, 'नरसी, खेडेगांवांत काम करण्याची कल्पना तुला कशी काय वाटते ?'

खेडेगांवांत जाऊन काम करण्याची कल्पना त्याला कांहीं नवीन नव्हती. कारण आसपासच्यां बऱ्याच खेड्यांतून डॉ. दीनानाथनीं इतर डॉक्टर लोकांच्या सहकार्यानें आरोग्यकेंद्रें काढलीं होतीं. तिथें नरसी आठवड्यांतून एकदां पाळीपाळीनें काम करण्यासाठीं जात असे. हें काम त्याला मनापासून आवडतहि असे. त्यानें म्हटलें, 'आणखी कांहीं नवीन केंद्रें काढायचीं आहेत का ?'

डॉक्टरनीं हंसून म्हटलें, 'काढायला हवींच आहेत. अशीं कितीहि केंद्रें काढलीं तरी कमीच पडणार. आणि नुसतीं केंद्रें काढून उपयोग काय ? तिथें काम करायला पुरेसे लोक मिळतात आहेत कुठें ? बरं, पण असं एकादं छोटंसं केंद्र तूं आतां स्वतंत्रपणें चालवूं शकशील कीं नाहीं ?'

अशी जबाबदारी आपण उत्तम तऱ्हेनें पार पाडूं अशी खात्री असल्याशिवाय डॉक्टर असा प्रश्न आपणाला विचारणार नाहींत ही त्याला खात्री होती. त्यानें स्वतंत्रपणें एका केंद्रावर कामहि केलेलें होतें. एकादं नवीन केंद्र उघडून ते आपल्या ताब्यांत देणार असतील या विचारानें त्याला आनंद वाटला आणि स्वतांचा थोडासा अभिमानहि वाटला. पण त्यानें नम्रपणें म्हटलें,

'आपल्या मार्गदर्शनाखालीं चालवूं शकेन असं वाटतं.'

त्याचें नम्र बोलणें आणि आदबशीर वागणें या त्याच्या गुणांमुळें तो डॉ. दीनानाथाना अधिकच प्रिय वाटे. त्यांनीं हसून म्हटलं,

'तूं आतां इतका तयार झाला आहेस कीं डॉक्टरची जिथें मदत मिळण्यासारखी नसेल तिथें डॉक्टरची गरज तूं सहज सारूं शकशील. त्या दृष्टीनेंच मी तुला तयार केला आहे.'

'कुठं काढायचं आहे केंद्र ?'

डॉक्टरनीं त्याच्याकडे पाहिलें आणि त्याच्या मनाचा अंदाज घेत म्हटलें— 'तुझ्या ज्ञानाचा उपयोग तुझ्या जन्मगांवच्या लोकांनाच व्हावा हें अधिक श्रेयस्कर आहे.'

नरसी गोंधळला. 'म्हणजे ?'

'म्हणजे असें कीं तूं तुझ्या गांवीं जाऊन तिथें आरोग्यकेंद्र काढावें.'

'पण....'

'पण काय ?'

'मी कुठल्याहि खेडेगांवात काम करण्यास तयार आहे. पण तिथं राहाणार नाहीं.'

डॉक्टर हंसले. 'तिथं राहिल्याशिवाय काम कसं करणार ? जिथं काम करायचं तिथेंच राह्यला हवं. त्याशिवाय काम कसं होणार ?'

नरसी कांहीं न बोलतां खालीं मान घालून निमूटपणें बसून राहिला. डॉक्टरनीं म्हटलें, 'नरसी, बारा वर्षांमागें तूं इथें आलास तेव्हां तूं किती अडाणी आणि अज्ञान होतास हें आठवतं का तुला ? तुला शिक्षण दिलं, चांगलें वळण लावून शहाणा केला. या शहाणपणाचा, तुझ्या या ज्ञानाचा उपयोग आतां यापुढें दुसऱ्या अज्ञान आणि अडाणी लोकांसाठीं करणं हें तुझं कर्तव्य नाहीं का ? दिव्यानें दिवा लावतात. ज्ञानाचंहि तसेंच आहे...'

बोलतां बोलतां तें थांबले, तेवढ्यांत नरसी दचकून खांदा झटकीत उठला. त्यांनीं विचारलें—

'काय झालं रे ?'

नरसी पुन्हां खालीं बसत म्हणाला, 'कांहीं नाहीं. वरून एकदम फूल पडलं.'

डॉक्टर हंसले नि म्हणाले, 'पाहिलंस? निसर्गसुद्धां या वेळीं तुला धडा देतो आहे. बारा वर्षांपूर्वीं तूं इथें हें झाड लावलंस, एवढं मोठं झालें. दरवर्षीं फुलांनी डंवरून जातें. पण ज्या जमिनींतून हें वर आलं, ज्या जमिनींत याचा जन्म झाला त्याच जमिनीवर याचीं सुगंधित फुलें पडतात. खरं ना?'

'मग ज्या गांवात तुझा जन्म झाला त्या गांवाला तुझ्या ज्ञानाचा उपयोग व्हायला नको का? तुझ्या सारखे दुसरे अनेक नरसी तुझ्या गांवांत असतील, त्यांचा विकास करणें तुझं काम आहे. तुझा पिता वृद्ध आहे, अगदीं एकटा आहे. दुष्काळांत वाताहात होऊन पोटासाठीं तुम्ही चार दिशांना पांगलात. पण आतां त्याच्या म्हातारपणीं एका मुलानें तरी त्याच्याजवळ राहून सेवा करायला नको का? म्हातारपणीं त्याला सुख आणि शांति द्यायला नको का? ज्या भूमींत जन्मलों तिची सेवा, ज्याच्या पोटीं जन्मलों त्यांची सेवा हेंच आपल्या जीवनांत त्यांचें ऋण फेडण्याचं साधन आहे. जीवनांत सेवेचं महत्त्व फार आहे. जीवन म्हणजेच सेवा. उद्यां मी म्हातारा झालों म्हणजे नंदकुमारनें आम्हां दोघांजवळ राहावं असं मला नाहीं का वाटणार—

डॉक्टर जसजसे बोलत होते तसतशी नरसीला एक नवीन दृष्टि प्राप्त होत होती. त्यानें हलकेंच म्हटलें—

'मी गांवाकडे जायला तयार आहे.'

'हें बघ, मी म्हणतो म्हणून नको जाऊंस. तूं माझ्या म्हणण्याच्या सर्व बाजूंनीं विचार कर. खेड्यांत जाणें तुझ्या जीवावर कां येतं मला समजतें. पण हें बघ, सारा दिवस आपण कांहीं ना कांहीं उद्योगांत गुंतलेले असलों म्हणजे वेळ जाण्यासाठीं करमणुकीची शहरी साधनांची जरूरी पडत नाहीं. त्यांची गरजहि

भासत नाहीं. तिथें मन प्रसन्न करायला, विचार उदात्त बनवायला निसर्गासारखा प्रेमळ मित्र सतत बरोबर असतो. खेडीं हीं आतां पूर्वीसारखीं खेडीं राहाणार नाहींत. त्यांचा हळू हळू विकास होतो आहे. त्या विकासाला प्रत्येकानें हातभार लावला पाहिजे. '

त्या रात्रीं नरसीचा डोळ्याला डोळा लागला नाहीं. त्याच्या मनांत विचारांची गर्दी उसळली होती. पण त्या विचारांत संताप, द्वेष अगर चीड नव्हती. जी नवी दृष्टी त्याला प्राप्त झाली होती त्यामुळें त्याला आतांपर्यंत न दिसलेल्या कितीतरी गोष्टी दिसूं लागल्या होत्या. खरोखरच, माणसाचें सुख कांहीं पैशावर का अवलंबून असतें ? छे, मनाच्या सात्त्विक समाधानाचं सुख कांहीं निराळेंच असतें. माझ्या खेड्यांत मीच जायला नको का ? माझे गांवाचा विकास मलाच करायला हवा ना ? डॉक्टरनीं मला आसरा दिला नसता तर मी अडाणीच राहिलों असतों ना ? मग माझ्या गांवांतल्या इतर अडाणी, अज्ञान लोकांची माझ्या हातून होईल तेवढी सेवा करायला नको का ? खेड्यांचीं शहरें आपणच बनवायचीं असतात ना?

+ + +

**नरसीचा निरोप—**

नरसी आपल्या गांवीं जाणार, तिथें आपल्या गांवच्या लोकांसाठीं आरोग्यकेंद्र काढणार ही बातमी घरीं दारीं, दवाखान्यांत आणि त्याच्या मित्रवर्गांत पसरली. तो सर्वांना प्रिय झाला असल्यामुळें त्या बातमीनें त्यांना वाईट वाटलें. पण त्याचबरोबर या उमद्या, हुशार तरुणाच्या समाजसेवातत्परतेचें त्यांना कौतुकहि वाटलें. आपल्या गांवीं जाणार म्हणून नरसी चेहऱ्यावर आनंद दाखवीत होता. पण त्याचें मन आंतल्या आंत रडत होतें. खेडेगांवांत राहावें लागणार याचें त्याला दुःख होत नव्हतें. उलट सेवाधर्माच्या,

कर्तव्याच्या जाणीवेनें त्याचें मन उत्साही बनलें होतें. पण ज्या कुटुंबांत आपण बारा वर्षें राहिलों, ज्यांनीं आपल्यावर आईवडिलां-पेक्षांहि जास्त प्रेम केलें, कुटुंबांतलाच एक म्हणून कधींहि कुठ-च्याहि बाबतींत कधीं दुजा भाव दाखवला नाहीं, त्यांना सोडून जावें लागणार—अगदीं कायमचें सोडून जावें लागणार या विचारानें तो रात्रंदिवस आंतल्या आंत झुरत होता.

लाडक्या मुलीला दूरदेशीं सासरीं पाठवतांना जय्यत तयारी करावी तशी डॉ. दीनानाथनीं नरसीची तयारी चालवली होती. जरूरीची औषधें आणि उपकरणें राहतील आणि वेळ प्रसंगीं व्हिजीटला नेण्यासाठीं उपयोगी पडेल अशी एक मोठी चामड्याची बॅग त्यांनीं नरसीसाठीं मुद्दाम खरेदी केली. दुसऱ्या पेटींत कित्येक औषधें, गोळ्या, ड्रेसिंगचें सामान जवळ जवळ एक छोटासा दवाखाना काढतां येईल एवढं सामान त्यांनीं दिलें. नवीन कपडे शिवले.

भगत गवळ्याला पत्र पाठवलें होतें. त्याप्रमाणें भगतबाबा मुलाला नेण्यासाठीं येऊन ठेपला. या डागदर साहेबांनीं काय किमया केली देवाला ठावं, पन पोरगा खुशीनें येनार म्हणतोय असं मनाशीं तीन तीनदां म्हणतांना म्हाताऱ्याचा आनंद मनांत मावत नव्हता.

नरसीच्या प्रवासाची सगळी तयारी झाली. दवाखान्यांतल्या मंडळींनीं आणि त्याच्या मित्रांनीं मोठा थाटाचा निरोप समारंभ केला. मेजवानी दिली. भेटीदाखल अनेक उपयुक्त आणि मौल्यवान वस्तू दिल्या. जायच्या आदल्या दिवशीं डॉक्टरांच्या घरींहि मेजवानीचा कार्यक्रम झाला. नरसीला आवडते म्हणून जिलबीचा बेत होता.

त्या रात्रीं जेवणोत्तर सर्व मंडळी पारिजातकाच्या झाडाखालीं पारावर गप्पागोष्टी करीत बसली होती. गेल्या बारा वर्षाच्या अनेक प्रसंगांची, विविध आठवणींची उजळणी झाली. नरसी चाललेल्या

अनुक्रम
विभाग
क्रमांक

गोष्टी मूक वृत्तीनें ऐकत होता. आपण कांहीं बोलावें अशी त्याला इच्छाच होत नव्हती. त्याचें मन अनेक गतस्मृतींनीं भरून आलें होतें. इथल्या जीवनांतली आजची ही त्याची शेवटचीच रात्र होती. हें घर, हें वातावरण, हीं प्रेमळ माणसें, हा आनंद सारें सारें त्याला आतां दुरावणार होतें.

बोलतां बोलतां डॉक्टरनीं म्हटलें, 'भगतबाबा, बरोबर बारा वर्षांपूर्वीं तुम्ही इथें नरसीला आणून सोडला होता. तो आज जशाचा तसा तुमच्या स्वाधीन करतोय.'

डोळ्यांत उभे राहिलेले आनंदाश्रू पुसून जमिनीवर डोकें टेकीत भगत गवळ्यानें म्हटलें—

'साहेब, जसाचा तसा नाहीं. मी आपनापायी दगड ठिवून गेलों व्हतो त्येचा आपुन देव केला. पोटच्या पोरावानीं वाढवलात, शिकवून शाना केलात.'

डॉक्टरनीं म्हटलें, 'मी कोण करणार बाबा! ईश्वराची कृपा. त्याच्याच प्रेरणेनें जगांत चांगल्या गोष्टी घडत असतात.'

'पन आपुनासारखी देवावानी माणसं या जगांत हायेत म्हून जग चाललया.'

डॉक्टरनीं म्हटलें, 'हें बघा, भगतबाबा, तिथें गेल्यावर या नरसीला त्याच्या मनाप्रमाणें वागूं दे; काम करूं दे. त्याच्या लग्नाच्या बाबतींत घाई करूं नका. त्यालाच स्वतःला मुलगी पसंत पडेल तीच निवडा. या बाबतींत त्याच्या मनाविरुद्ध जाऊं नका.'

भगत गवळ्यानें हात जोडून म्हटलें, 'नाई बा, नाई बा, असं कदी मी करनार नाई. तो करील तें मी झेलीन. त्याच्यावानी त्याची बायकूबी शिकलेली, शानीच होवी हें काय मला कलत नाहीं!'

डॉक्टरीणबाईनीं हसून म्हटलें, 'भगतबाबा, डॉक्टरनीं,

११४६ मर
२ दि
१९५१



नरसीचा धंद्याचा संसार थाटून दिला आहे. मी त्याच्या घरांतला संसार थाटून देणार आहे हं.'

हर्षाचा आनंद गिळत भगत गवळ्यानें म्हटलें,

'आपुलाच पोरगा आहे बाईसाहेब, मी त्येला जलम दिला इतकंच. आपल्या हुशारीनें आतां त्यानें आपुलं दोघांचंबी नांव राखाया होवं.'

नरसी स्तब्धच बसलेला होता. डॉक्टरीनबाईंनीं त्याच्याकडे पाहात हंसून म्हटलें, 'मुलगी निवडलीस कीं पहिल्यानें तिला इथं पाठवून दे. माझ्या हाताखालीं माझ्या सुनेला बरोबर तयार करून पाठवीन.'

अशा प्रेमाच्या आणि जिव्हाळ्याच्या विविध गोष्टींनीं त्याचें मन अधिकाअधिक भरून आलें. त्याला तिथें बसवेना. तेवढ्यांत नंदकुमाराला झोंप यायला लागली. तें निमित्त पाहून तो झटकन उठला आणि त्याला घेऊन खोलींत आला. दोघे एकाच खोलींत झोंपत असत. त्याला झोंपवण्यासाठीं त्याच्या कॉटवर नरसी बसला, तेव्हां त्याच्या गळ्यांत हात टाकून नंदूनें म्हटलें,

'नरसीदादा, तूं गांवीं कशाला जातोस ? तूं गेलास म्हणजे मला नाहीं करमणार. तूं नको जाऊंस ना ? अं ?'

तट्ट फुगलेला फुगा टांचणींचे टोक लागतांच फट् फुटावा त्याप्रमाणें त्याच्या त्या लाघवी कृतीनें आणि बोलण्यानें नरसीच्या मनाचा बांध फुटला. नंदूला छातीशीं धरून तो मनसोक्त रडला. कांहीं वेळानें मन हलकें झाल्यावर त्यानें म्हटलें,

'मोठं झालं म्हणजे कामधंद्यासाठीं असंच घर सोडून दूर जावं लागतं. उद्यां तूं मोठा झालास म्हणजे तुलासुद्धां असंच जावं लागेल.'

\+ \+ \+ \+

BVBK-0404597

सकाळची गाडी असल्यामुळें सर्व मंडळी लवकर उठली होती. दाराशीं टांगा आला, सामान काढलें. नरसीनें डॉक्टरांच्या पायावर डोकें ठेवलें. त्यांनीं लगेच त्याला उठवून पितृप्रेमानें छातीशीं धरलें नि म्हटलें—

'सुखी राहा. नेहमीं सद्बुद्धीनें वागून किर्तीवान हो.'

डॉक्टरीणबाईंच्या पायावर मस्तक नम्र केलें तेव्हां मात्र त्याला हुंदका आवरेना. त्यांच्या पायावर त्याच्या नेत्रांतले अश्रू टपटप गळले. डॉक्टरीणबाईंनीं त्याला जवळ घेऊन पाठीवर हात फिरवीत स्वतःचे डोळे पदरानें टिपून हुंदका गिळला नि म्हटलें,

'उगी राहा, अन् हें बघ, हें घर तुझंच आहे हें लक्षांत ठेव. वर्षांतून एकदां तरी इथें हक्कानें येत जा. तूं आमचा मोठा मुलगा आहेस हें आम्ही कधीं विसरणार नाहीं.'

नरसीनें महाप्रयासानें अश्रू आवरले, चेहरा हंसतमुख केला नि सर्वांना नमस्कार करीत तो दाराकडे वळला. दारांत उभ्या असलेल्या नंदकुमारच्या पाठीवर थोपटलं आणि पुन्हां हात जोडीत अश्रूपूर्ण डोळ्यांनीं पण हंसतमुखानें म्हटलें—

'आम्ही जातो आमुच्या गांवा, आमुचा राम राम घ्यावा.'

भगत गवळी आणि नरसी टांग्यांत बसले. टांगा निघाला. डॉ. दीनानाथ दारांत उभे राहून पहात होते. बारा वर्षांपूर्वीं याच वेळीं सकाळीं नऊ वर्षांचा एक छोटा, अडाणी, गांवढळ पोरगा आला होता. आणि आज तोच एकवीस वर्षांचा उमदा हुशार, कार्यप्रवृत्त तरुण बनून जात होता. त्यांना समाधान वाटलें. गेला म्हणून दुःखहि वाटलें, पण तो गेला, त्याच जागीं आज छोटा नंदकुमार—दुसरा नरसी आहे असं त्यांनीं मनाचें समाधान केलें नि ते आंत वळले.

## ❀ आमचे सण व इतर बालवाङ्मय ❀

| | | |
|---|---|---|
| १ | गुढी पाडवा | ०–६–० |
| २ | वसंत गौरी | ०–४–० |
| ३ | सती सावित्री | ०–१०–० |
| ४ | नागपंचमी | ०–६–० |
| ५ | मंगलमूर्ति | ०–८–० |
| ६ | हरितालिका | ०–८–० |
| ७ | तिळगूळ घ्या गोड बोला | ०–४–० |
| ८ | महाशिवरात्र | ०–५–० |
| ९ | होळी | ०–५–० |
| १० | आमचे नेताजी | १–०–० |
| ११ | आमचे गांधीजी | ०–८–० |
| १२ | फुलराणी | ०–५–० |
| १३ | पोपटाचा डोळा | ०–४–० |
| १४ | सोन्याची दौलत | ०–८–० |
| १५ | रामाची करामत | ०–६–० |
| १६ | उदयकुमार | १–०–० |
| १७ | नरसी भगत | ०–८–० |
| १८ | भारताचा लाडका मुलगा | १–८–० |